महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

**अत्यंत महत्वाचे /कालमर्यादित**

जा.क्र.पुविमं/उमाब–माध्य.क/6003.
दिनांक 12/11/2024.

प्रति,
प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व अनुदानित, विनाअनुदानित, अंशतः अनुदानित, स्वयं अर्थसहाय्य व इंग्रजी माध्यम,
शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, जिल्हा – पुणे, अहमदनगर व सोलापूर.

**विषय : फेब्रु./मार्च, 2025 व जुलै/ऑगस्ट, 2025 परीक्षेसाठी शाळां school profile व कनिष्ठ महाविद्यालय College profile अद्ययावत करणेबाबत...**

**संदर्भ : 1. इ.12वी करीता क.रा.मं./परीक्षा–3/4305 दिनांक 29/10/2024 चे पत्र.**
**2. इ.10वी करीता क.रा.मं./परीक्षा–3/4345 दिनांक 04/11/2024 चे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भीय 1 व 2 च्या पत्रानुसार इ.10 वी व इ.12वी परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याची मुदत खालीलप्रमाणे निर्धारित केलेली आहे.

| अ.क | तपशील | नियमित शुल्क मुदतवाढ | विलंब शुल्क मुदतवाढ |
|---|---|---|---|
| 1. | **इ.12वी** | दिनांक 14/11/2024 | दिनांक 22/11/2024 |
| 2. | **इ.10 वी** | दिनांक 19/11/2024 | दिनांक 30/11/2024 |

1. तरी सर्व अनुदानित, विनाअनुदानित, अंशतः अनुदानित, स्वयं अर्थसहाय्य व इंग्रजी माध्यम माध्यमिक विद्यालये (इ.10वी) व कनिष्ठ महाविद्यालये (इ.12वी) यांनी **mahahscboard.in** या संकेतस्थळावर आवेदनपत्र भरताना **school/College profile मध्ये शाळा/ कॉलेजची माहिती, संस्थेची माहिती, मान्यता प्राप्त विषय व तसेच इ. 10 वी व 12 वी वर्गास शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांची माहिती भरणे बंधनकारक आहे. त्यासाठी प्रोफाईल माहिती भरण्यासाठी <u>दिनांक 30 नोव्हेंबर, 2024 पर्यंत</u> मुदत देण्यात आली आहे.** त्यानुसार दिलेल्या मुदतीत ज्या शाळा/क. महाविद्यालयांनी उपरोक्त नमूद माहिती विहित मुदतीत भरली नसल्याचे मंडळ कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास त्यांची फेब्रु./मार्च, 2025 परीक्षेची प्रिलिस्ट, विद्यार्थी यादी व फीचे चलन मंडळाकडून स्विकारले जाणार नाहीत. याची गांभीर्याने नोंद घेवून यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करावी.

..2/–

2. तसेच शिक्षक पॅनल अद्ययावत करण्यासाठी मंडळाकडून आपल्या शाळा/क.महाविद्यालयांना शिक्षक पॅनलची प्रत यापुर्वी पाठविण्यात आली होती तथापि ज्या शाळा/क.महाविद्यालयांनी पॅनल अद्ययावत करुन अद्याप मंडळाकडे जमा केले नाही त्यांनी सदरचे पॅनल व प्रिलिस्ट साहित्य जमा करतेवेळी मंडळप्रतिनिधीकडे सादर करावे. अन्यथा प्रिलिस्ट, विद्यार्थी यादी व फीचे चलन मंडळाकडून स्विकारले जाणार नाहीत.

***<u>महत्वाची सुचना</u> :–***

3. इ.10 वी व इ.12 वी फेब्रु./मार्च, 2025 व जुलै/ऑगस्ट, 2025 परीक्षेसंबंधित उत्तरपत्रिका तपासणी व परीक्षेसंबंधित इतर कामकाजासाठी आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील हजेरी पटावरील प्रत्येक विषय शिक्षकांची नावे ऑनलाईन प्रोफाईलमध्ये भरण्याची जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच संस्था सचिवांची राहील.
4. तसेच तात्पुरत्या स्वरुपात ज्या विषय शिक्षकांची नियुक्ती केली जाते त्यांची नावे शिक्षक पॅनलमध्ये शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून मंडळास कळविले जाते परंतु अभ्यासक्रम पूर्ण होताच त्यांना संस्थास्तरावरुन कमी केले जाते, असे मंडळाच्या निदर्शनास आले आहे.

त्यामुळे ज्या प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी/संस्था सचिवांनी एखाद्या विषयास तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकाची नियुक्ती केली आहे त्यांच्याकडून मंडळाच्या परीक्षेसंबंधित कामे करुन घेण्याची जबाबदारी ही प्राचार्यांची/मुख्याध्यापकांची/संस्था सचिवांची राहील. याकरीता तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या शिक्षकांना परीक्षेच्या निकाला संबंधित कामे पूर्ण होण्याच्या कालावधीपर्यंत ठेवण्याची जाबाबदारी प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी/संस्था सचिवांची राहील. संबंधित विषय शिक्षकास मंडळाकडून उत्तरपत्रिका तपासणीचे काम किंवा परीक्षेसंबंधित इतर कामाचे आदेश प्राप्त होताच त्यांच्याकडून काम करुन घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची/मुख्याध्यापकांची राहील.

5. ***शिक्षकांच्या हजेरी पटावर विषय शिक्षकांची नावे आहेत आणि प्रोफाइलमध्ये भरले नाहीत, असे मंडळाच्या तपासणी पथकाच्या निदर्शनास आल्यास तसेच नियमित किंवा तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती केलेल्या विषय शिक्षकास मंडळाकडून उत्तरपत्रिका तपासणीचे काम किंवा परीक्षेसंबंधित इतर कामाचे आदेश प्राप्त होताच त्यांच्याकडून काम करुन घेण्यास टाळाटाळ केल्यास संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्यावर परीक्षा कामकाजात अडथळा निर्माण केला व कामात कसूर केल्याचा ठपका ठेवून नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल, याची मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी गांभीर्याने दखल घ्यावी.***

उपरोक्त 1 ते 5 सुचनांप्रमाणे ऑनलाईन प्रोफाईलनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती, विषय व माध्यमांची माहिती, विषय शिक्षकांची माहिती भरणे तसेच अगामी परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज व परीक्षासंबंधित जबाबदारीचे कामे करण्याची कार्यवाही करावी.

फेब्रु.मार्च, 2025 परीक्षेचे प्रिलिस्ट, विद्यार्थी यादी, फीचे चलन स्विकारण्याचा दिनांक व संकलन केंद्राचे ठिकाण इ. माहिती यथावकाश कळविण्यात येईल. सदर पत्राची नोंद घेवून विहित मुदतीत कार्यवाही करावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे .